Rotary | SERVE TO CHANGE LIVES

Year: 52 Vol: 04 October 2021



# southern star ...अवघे धरू सुपंथ

## Official Bulletin Of The Rotary Club Of Pune South

**President:**
Rtn. Atul Atre

**Secretary:**
Rtn. Krishnakiran Velankar

**Editor:**
Rtn. Abhijit Deshpande








# घरगुती सोयादूध उत्पादन प्रशिक्षण

पी.पी. डॉ. सुधांशु गोरे

आपल्या क्लबने मार्च २०२१ मध्ये एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे..

"घरगुती सोयादूध उत्पादन प्रशिक्षण" त्याविषयी माहिती देत आहे.

१. प्रेरणा -- आपले पीडीजी भाऊसाहेब कुदळे यांनी हा प्रकल्प सुचवला आणि ते स्वतः त्यामध्ये सहभागी आहेत.

२. उद्दिष्टे -- या प्रकल्पाचे प्रवर्तक श्री. रणजित पाल हे सेवानिवृत्त आयएएस अधिकारी आहेत. ते म्हणतात, "गोरगरीब कुटुंबातील बालकांना गाईम्हशींचे दूध मिळत नाही म्हणून त्यांचे कुपोषण होते आणि न भरून येणारी हानी होते. ती थोपवण्याचा सोपा आणि स्वस्त तरीही परिणामकारक उपाय म्हणजे 'सोयादूध' आहे, म्हणून मी त्याचे प्रशिक्षण देऊन प्रसार करू इच्छितो".

३. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या स्त्री शक्ती प्रबोधन या विभागाच्या प्रमुख सौ. सुवर्णाताई गोखले यांनी कल्पना मांडली की, गावोगावी असलेल्या अंगणवाड्यांमध्ये बहुतेक सर्व बालके कुपोषणग्रस्तच असतात, त्यांना जर आपण सोयादूध पुरवू शकलो तर प्रकल्पाचे उद्दिष्ट साधायला मदत होईल.

श्री. पालसाहेब आणि सुवर्णाताई यांच्या एकत्रित कल्पनेतून आपला प्रकल्प साकारला आहे.

४. प्रशिक्षण पद्धत --

सुवर्णाताईंच्या मदतीने, वेल्हे तालुक्यात एका विशिष्ट दिवशी १० ते २० महिला एकत्र येऊन हे प्रशिक्षण घेतात. साधारण चार ते पाच तासांच्या कालावधीमध्ये पालसाहेब स्वतः त्या महिलांसमोर सोयाबियांपासून दूध, दही व पनीर कसे बनवायचे त्याचे प्रात्यक्षिक दाखवतात.

आता आपल्या क्लबचे काही सदस्य प्रशिक्षक म्हणून काम करतील.

५. श्री. पालसाहेब केवळ प्रशिक्षण देऊन थांबत नाहीत, त्यांनी अशी प्रशिक्षण शिबीरे घेण्यासाठी आपल्या क्लबला रु. एक लक्ष एवढी देणगी दिली आहे.

६. अशा प्रशिक्षित महिलांना सुवर्णाताईंनी एकेक अंगणवाडी ठरवून दिलेली आहे, तिथे त्या महिलेने रोज बालकांना सोयादूध पुरवायचे आहे.

त्या दुधाची खरेदी आपला क्लब करेल.

७. या सर्व घडामोडींवर सुवर्णाताईंच्या संघटनेचे नियंत्रण राहील.

८. सध्या अंबवणे परिसरात १० अंगणवाड्या ठरवून तेथे हे काम सुरू आहे, सदस्यांनी अवश्य केंव्हाही भेट द्यावी.

९. मार्च महिन्यात सुवर्णाताईंच्या मदतीने करंजावणे येथील प्रा. आ. केंद्रात १०० बालकांची प्रकल्पपूर्व तपासणी करून नोंदी केलेल्या आहेत. त्यांना १०० दिवस सोयादूध दिल्यानंतर पुन्हा तपासणी केली जाईल. हे काम डॉ. बागेश्री देवकर या बालरोगतज्ञांनी स्वतः येऊन केले होते.



## Rtn. Abhijit Deshpande (AB)

पी.पी. रो. गोविंदरावांच्या घरी काही निमित्ताने जाण्याचा योग आला. गोविंदराव आणि चारुताई दारातच स्वागताला हजर होते. "दिलेल्या वेळेप्रमाणे अगदी exact आलात" असे पहिल्यांदा कौतुक करून दोघांनी अतिशय आपुलकीने स्वागत केले. कोणतीही छोटी गोष्ट असली तरी भरपूर कौतुक करून प्रोत्साहन देणे ही आपल्या क्लबमधील "पेटंटेड" पद्धत आहे आणि ती गोविंदराव अगदी नित्यनेमाने कधीही भेट झाली तरी पाळतातच.

गोविंदराव आणि चारुताई यांनी आपल्या क्लब बद्दल खूप आठवणी सांगितल्या, अनेक जुने मेंबर्स, प्रेसिडेंट्स यांच्याबद्दल खूप काही भरभरून सांगितले आणि इतक्या वर्षांमध्ये राबवलेल्या विविध आगळ्यावेगळ्या प्रोजेक्ट्स बद्दल माहिती दिली. गप्पामध्ये २ तास कसे गेले समजलेच नाही. निघायच्या वेळेस गोविंदरावांनी समोर एक बाइंड केलेली थप्पी दाखवली. आपल्या क्लबच्या बुलेटिनचे जुने अंक गोविंदरावांनी एकत्र बाइंड करून जपून ठेवले आहेत, ते त्यांनी मला वाचायला घेऊन जा म्हणून दिले.


घरी आल्यावर हे अंक वाचताना आणि एकूण झालेली चर्चा आठवताना अगदी प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट ही की पुणे साऊथच्या रूपाने कित्ती मोठा वारसा आपल्याला मिळाला आहे. त्यांनी केलेले प्रोजेक्ट्स हे खूप पूर्वी केलेले असले तरी आजदेखील राबवता येण्यासारखे आहेत, म्हणजे त्याकाळी तर ते अतिशय प्रागतिकच असणार.


तर इतकी मोठी परंपरा आणि डिस्ट्रिक्ट मध्ये दबदबा असलेल्या क्लबमध्ये आपल्याला सहभागी होता येतंय याचा आपल्याला खूप आनंद आणि अभिमान असायला हवा आणि आपल्यापैकी प्रत्येकाला तो आहेच.


पण मग आता अभिमान आणि आनंद झाला पुढे काय. तर या परंपरेला साजेसे प्रोजेक्ट्स करणे आणि जुने चालू असेलेले अधिक जोमाने आणि भर घालून पुढे नेणे ही सर्वात मोठ्ठी जबाबदारी आपल्यावर आहे. याकरिता सर्वात महत्वाचे म्हणजे आपला सक्रिय सहभाग. माझ्या दृष्टीने "सक्रिय सहभाग" म्हणजे फक्त हजेरी नव्हे तर आपल्याकडे असलेली skills आणि resources म्हणजे कौशल्य आणि संसाधने याद्वारे योगदान देणे. रोटरीच्या "Avenues of Service" मध्ये मी माझे skills आणि resources कशाप्रकारे वापरू शकेन याची जाणीव ठेवल्यास आपल्याला कितीतरी नवनवीन कल्पना सुचू शकतात आणि मग "सक्रिय सहभाग" अगदी सोपा होऊन जातो. शिवाय या कल्पना राबवायला Rotary ची एवढी मोठ्ठी यंत्रणा आपल्याकडे तयार आहेच. समाजात दूरगामी परिणाम करणारे कितीतरी प्रोजेक्ट असेच तर सुरु झाले आणि वर म्हटल्याप्रमाणे प्रोत्साहन देणे हे आपले पेटंट असल्यामुळे आपल्या कामाची पावती लगेचच मिळते.

बुलेटिनबद्दल बोलायचे झाले तर गोविंदरावांनी कोपरखळ्या मारत, कान पिचक्या घेत मेंबर्स, प्रोजेक्ट्स याबद्दल मांडलेली मते आणि माहिती हे सर्व केवळ अप्रतिम. नुसते बुलेटिन वाचून त्यावेळचा पुणे साऊथ डोळ्यासमोर उभा राहतो. इंटरनेट तर राहूच दे, मोबाईल देखील नसलेल्या काळात फक्त बुलेटिनद्वारे संवाद साधण्याची त्यांच्या सारखी कला मला तरी इतक्यात जमणार नाही. पण एक मात्र खरे, या सर्व मंडळींचे काम आणि निष्ठा पाहून काम करण्याचा हुरूप नक्की वाढतो.

तर मग चला विचार करूया आपले कोणते skills आणि resources आपण वापरू शकतो. आणि हो जाता जाता थोडं माझ्या स्वार्थाचे, बुलेटिन करिता काही लिहिणे हे देखील एक skill आहे आणि आपले बुलेटिन हे resource आहे....तर त्याचा वापर नक्की करा 





( 8 )

Rotary Club of Poona South
LIST OF WEEKLY PROGRAMMES 1988-89

| Meeting Date | Subject | Speaker | Avenue of Service |
|---|---|---|---|
| 5-7-1988 | a) Installation | Rtn. D.G. Laxmikant Bhojwani | Club |
| | b) Induction of Hon. Member | Br. Vitthalrao Gadgil | Club |
| 15-7-1988 | Development in Rotary | PRID R. K. Saboo | Club |
| 19-7-1988 | Condolence Meeting Rtn. PP Haribhau Joshi passed away. | Rtn. Balasaheb Chitale<br>Rtn. Nana Tamhankar<br>Rtn. PP Pa. Bha. Kulkarni<br>Rtn. Annc. Sou Sumantai Rajhans<br>Rtn. Dada Karandikar<br>Rtn. Dr. Bhau Sabade<br>Rtn. Annc. Sou. Latatai Hardikar | Club |
| 26-7-1988 | [illegible] | Mr. Chittaranjan Kolhatkar. | Vocational |
| 2-8-1988 | Business Meeting Budget. | Rtn. Shriram Gogate | Club |
| 9-8-1988 | [illegible] ? | Rtn. Govind Patwardhan<br>Rtn. Dr. Bhau Sabade<br>Rtn. Shriram Gogate<br>Rtn. Anil Lokhande | International |
| 16-8-1988 | [illegible]<br>Skit by Shivajinagar Club. | Rtn. Dr. M. L. Abhyankar | Club |
| 23-8-1988 | [illegible] | Mrs. Vidya Bal | Community |
| 30-8-1988 | [illegible] ? | Dr. P. L. Gawade | Community |
| 6-9-1988 | Business Meeting : Planning of Governor's Visit | Members | Club |
| 13-9-1988 | Governor's Visit. | Rtn. DG Dr. Laxmikant Bhojwani | Club |
| 20-9-1988 | Know your New Rotarians. | Rtn. Arun Joshi<br>Rtn. Abhijit Jog<br>Rtn. Deodhar<br>Rtn. Deshpande<br>Rtn. Sanjay Dadarkar | Club |
| 26-9-1988 | [illegible] | वी. श. पु. [illegible] | Club |
| 4-10-1988 | [illegible] | Dr. R. S. Walimbe | Community |
| 11-10-1988 | [illegible] | Dr. Sharad Wagh | Community |
| 18-10-1988 | [illegible] | Dr. Sarojini Babar | Community |






Vocational Service

Vocational Service is the "Second Avenue of Service." No aspect of Rotary is more closely related to each member than a personal commitment to represent one's vocation or occupation to fellow Rotarians and to exemplify the characteristics of high ethical standards and the dignity of work. Programs of vocational service are those, which seek to improve business relations while improving the quality of trades, industry, commerce and the professions. Rotarians understand that each person makes a valuable contribution to a better society through daily activities in a business or profession. Vocational service is frequently demonstrated by offering young people career guidance, occupational information and assistance in making vocational choices. Some clubs sponsor high school career conferences. Many recognize the dignity of employment by honoring exemplary service of individuals working in their communities. The 4-Way Test and other ethical and laudable business philosophies are often promoted among young people entering the world of work. Vocational talks and discussion of business issues are also typical vocational service programs at most clubs. Regardless of the ways that vocational service is expressed, it is the banner by which Rotarians "recognize the worthiness of all useful occupations" and demonstrate a commitment to "high ethical standards in all businesses and professions." That's why the Second Avenue of Service is fundamental to every Rotary club.

Community Economic Development

The month of October was earlier designated as Vocational Service month. It was later redesignated as Community Economic Development month.

The aim of this theme is to promote economic and community development and reduce poverty in underserved communities through training, well-paying jobs, and access to financial management institutions. Projects range from providing people with equipment to vocational training. Rotary members work to strengthen local entrepreneurs and community leaders, particularly women, in impoverished communities.




## Distribution of stationary at Nutan Bal Vikas Mandir
## २ सप्टेंबर २०२१








## रोटरॅक्ट क्लब
## ४ सप्टेंबर २०२१

४ सप्टेंबर रोजी आपल्या रोटरॅक्ट क्लबने एक सुरेख उपक्रम राबवला.

स्त्री संस्था औद्योगिक सहकारी मंडळ व बुधवार पेठ येथील आशा केअर सेंटर येथील महिलांना आज सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप केले. दोन्हीकडे मिळून आज ५ मोठे बॉक्स म्हणजे सुमारे ५०० सॅनिटरी नॅपकिन्स पॅकेटस् चे वाटप झाले.

आपल्या क्लब कडून फर्स्ट लेडी नंदिनी यांनी भाग घेतला.

आपल्या रोटरॅक्ट क्लबने गेल्या दीड महिन्यात ३ प्रोजेक्टस् केले आहेत त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !





# इंटरॅक्ट इन्स्टॉलेशन
## ७ सप्टेंबर २०२१

७ सप्टेंबर रोजी आपल्या क्लब तर्फे सरस्वती विद्या मंदिर अंबवणे येथे इंटरॅक्ट इन्स्टॉलेशन चा कार्यक्रम पार पडला. यावर्षीचे हे तिसरे इंटरॅक्टचे इन्स्टॉलेशन आहे. तसेच माधुरी व उदय किरपेकर यांनी हॅन्ड वॉशिंग इन्स्ट्रक्शन बोर्ड व पिरिऑडिक टेबल दिले होते त्याचे अनावरण सुद्धा केले.

आपल्या तर्फे रो. माधुरी व उदय किरपेकर, ॲन माधवी देशपांडे, ॲन यामिनी पोंक्षे, रो. मृदुला घोडके, ॲन नेहा वाळिंबे, ॲन सुगंधा नातू, रो. मिलिंद क्षीरसागर, फर्स्ट लेडीड नंदिनी अत्रे तसेच किरपेकर कुटुंबाचे मित्र सुद्धा उपस्थित होते. रो. दत्ताजी व ॲन अंजलीताई देवधर हेसुद्धा आवर्जून उपस्थित होते.

सकाळी सर्वजण प्रथम सरस्वती विद्यालयात जमले. नंतर उदय किरपेकर यांनी वॉशिंग इन्स्ट्रक्शन बोर्डचे व रो. माधुरी किरपेकर यांनी पिरीओडिक टेबल बोर्डचे अनावरण केले. त्यानंतर इन्स्टॉलेशन सेरीमनी पार पडला. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून रो. मृदुला घोडके यांनी सुंदर भाषण केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन रो. माधुरी किरपेकर यांनी उत्कृष्ट केले होते.

त्यानंतर तिथून सर्वजण रो. दत्ताजी देवधर यांच्या फार्म हाऊस वर गेलो. येथे दत्ताजी व अंजलीताई यांनी सुरेख जेवणाची सोय केली होती. नंतर सर्वांनी दत्ताजींच्या शेतात फेरफटका मारला व दुपारी सर्वजण परत जायला निघाले.








## एड्स बाधित रुग्णांच्या कुटुंबियांकरता मासिक शिधा वाटपा
## १० सप्टेंबर २०२१

**आपल्या क्लब तर्फे काल दुपारी ग्राहक पेठेमध्ये एड्स ने बाधित रुग्णांच्या कुटुंबियांकरता ह्या वर्षातला तिसरा मासिक शिधा वाटपाचा कार्यक्रम पार पडला.**

**आपले पी. पी. रो. वीरेंद्र शहा यांच्या ओळखीने आपल्याला " लक्ष्मीनारायण सीनियर सिटीझन ग्रुप " यांनी रुपये १०,००० या उपक्रमाकरता दिले. वीरेंद्र भाई व त्यांचे मित्र यांचे मनःपूर्वक धन्यवाद !**

**कार्यक्रमाचे नियोजन रो. अरविंद मावळणकर यांनी केले.**





## सोया मिल्क प्रोसेससिंग ट्रेनिंग
## १७ सप्टेंबर २०२१

**१७ सप्टेंबर रोजी आपल्या क्लब तर्फे सार्थक सेवा संघ, आंबळे येथे खालील दोन प्रोजेक्ट करण्यात आले**

**१. आपला क्लब, रोटरी क्लब हिल साइड व लाईफ ट्यून फाउंडेशन अशा तिघांनी मिळून तिथे दोन हायड्रोपोनिक मशीन्स दिली . या मशीन्स मुळे गाईंना मक्याच्या बियांपासून दर्जेदार चारा खाण्याकरता उपलब्ध होतो.**

**२. आपला सोयाबीन पासून दूध तयार करणे या प्रकल्पाचे वर्कशॉप आपण तिथे घेतले. या वर्कशॉपला उत्तम प्रतिसाद मिळाला. तिथल्या मुलांकरता आपण सोयाबीन पासून दूध, दही व पनीर करण्याचे प्रात्यक्षिक केले. या प्रकल्पाचे पुरस्कर्ते आपले पीडीजी रो अरुणजी कुदळे व रणजीत पाल साहेब आवर्जून उपस्थित होते. रणजीत पाल साहेबांनी त्या संस्थेला मिक्सर व प्रेस मोफत दिला.**

**या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आपले डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. पंकज शहा व आपले पीडीजी रो. अरुणजी कुदळे हे दोघेही कार्यक्रमाला पूर्णवेळ उपस्थित होते. तसेच श्री रणजीत पाल, एजी रो. संदीप विळेकर, एजी रो. धनश्री जोग, पी. ई. रो. संजीव ओगले, पी. एन. रो. रवींद्र प्रभुणे व डायरेक्टर  पी. पी. रो. डॉ गोरे हे उपस्थित होते.**

**संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन पी. एन. रो. रवींद्र प्रभुणे व डायरेक्टर पी. पी. रो. डॉ गोरे यांनी उत्कृष्ट केले.**







## करोना जागृती फलक
## १७ सप्टेंबर २०२१

१७ सप्टेंबर रोजी नागनाथ पार गणेश उत्सव मंडळ येथे आपल्या क्लब तर्फे करोना बद्दल नागरिकांना जागृती करण्याकरता सूचना फलक लावला. आपल्या पब्लिक रिलेशन्स कमिटीतर्फे रो. दत्ताजी पाषाणकर यांच्या पुढाकाराने आपण हा बोर्ड लावला.

आपल्या क्लब तर्फे प्रेसिडेंट रो. अतुल अत्रे,  पीपी रो. अभिजीत जोग, पीपी रो. संदीप विळेकर, पीपी रो. श्याम कुलकर्णी, रो. भाऊ सहस्त्रबुद्धे, सेक्रेटरी रो. किरण वेलणकर, पी. ई. रो. संजीव ओगले, पीपी रो. गोविंदराव पटवर्धन, रो. अभिजीत देशपांडे, रो. दत्ताजी पाषाणकर,पीपी रो. डॉ. किरण पुरोहित तसेच पीपी रो. डॉ. राजेंद्र गोसावी हे उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर दत्ताजी व अंजली पाषाणकर यांनी त्यांच्या घरी सुरेख फेलोशिप आयोजित केली होती.








## Gold Satellite Club E-Waste Collection Drive
## 5th September 2021

Rotary Satellite Club of Pune South Gold conducted a Service project of e-waste collection which was conducted on 5th September 2021, Sunday at Hills & Dales, Undri between 10 AM to 12:30 PM.

E-waste includes any old, obsolete, broken electrical or electronic product which is discarded.

Goal of the drive was to spread awareness about e-waste recycling to save our environment and collecting the e-waste which otherwise goes into the garbage.
Approximately 350 KG of e-waste was collected.

Parent club members Rtn. Madhuri Kirpekar and Rtn. Mridula Ghodke were present along with the members of the club.

Club Chairperson Rtn. Onkar Joshi and members Rtn. Anushree Athalye, Rtn. Neha Deshpande, Rtn. Bahar Tepan, Rtn. Sapana Dabholkar, Rtn. Anjali Kirtane, Rtn. Sameer Sharma, Rtn. Gaurav Agrawal, Rtn. Ashish Agrawal were present.
Hills & Dales Society Club House was provided by the secretary of the society for this event.

The collected waste was successfully transported to Mr. Mandar Walke from e-waste collection agency Tes-AmmRecyclers via tempo.

Overall, it was second successful e-waste collection drive by the club.
This service project will be an ongoing project and will be conducted regularly in approximately 3 months' interval in Pune.









# व्हय मी सावित्री-डॉ. उज्ज्वला करंडे

६ सप्टेंबर २०२१

**ॲन मोहिनी नातू**

नमस्कार मंडळी...

सहा सप्टेंबर ची साप्ताहिक सभा ही शिक्षक दिन विशेष अशी होती... आपल्या खास पाहुण्या डॉ. उज्ज्वला करंडे या होत्या... पुणे युनिव्हर्सिटीमधून एम ए पदवीच्या त्या सर्वोच्च गुणांच्या विक्रमासह सुवर्णपदक विजेत्या आहेत... अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत... स्त्री संबंधित विषयावर बरेच लेखन त्यांनी केले आहे... व्याख्याने दिलेली आहेत... या विषयांशी संबंधित लेखांचं सदर त्यांनी लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीतून एक वर्षभर सादर केलं...

आणि या सदरातील लेखांचंच पुढे पुस्तक झालं.. 'ती'च मनोगत....

आपल्या सभेत त्यांनी त्यांच्या विचारप्रवर्तक प्रास्ताविका सहित सादर केलं एकपात्री नाटक.. "व्हय मी सावित्री".... होय... ज्योतिबा फुले यांची अर्धांगिनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ....यांच्या जीवन कथेवर आधारित एकपात्री प्रयोग...

ज्योतिबा,स्वतः सावित्री आणि ज्योतिबा यांचे वडील या सर्वांच्या संवादातील भावनांचे चढ-उतार त्यांनी फार प्रभावीपणे दाखवले.... सतत चाळीस मिनिट एकटीनेच बोलून सादर केलेल्या या प्रयोगातून सावित्रीच्या आयुष्यातील प्रसंगांच्या अवघडपणाचा आणि त्यातून धीटपणे पार पडण्याच्या त्यांच्या, धाडसाचा, कौशल्याचा आपण सार्थ अंदाज बांधू शकतो...इतकं त्यांचं सादरीकरण सुरेख होत....

आजच्या स्त्रीने मात्र शिक्षण, स्वावलंबन,आत्मविश्वास इत्यादी करता मात्र सावित्रीबाईसारख्या स्त्रियांनी केलेल्या दीपस्तंभासारख्या कार्याबद्दल नेहमीकरता ऋणी असायला हवं.... अत्यंत आखीव-रेखीव नेटका कार्यक्रम सादर झाल्याबद्दल डॉ.उज्वला त्यांचे मनःपूर्वक आभार....

सभेच्या सुरुवातीला 30 ऑगस्ट च्या सोमवारी झालेल्या "पाऊसधारा" या कार्यक्रमातील सर्व कलाकारांचे अध्यक्ष अतुल अत्रे आणि फर्स्ट लेडी नंदिनी यांनी कौतुक केले.... सभासद संख्या वाढविण्याकरिता ज्यांनी ज्यांनी विशेष प्रयत्न केले त्या सर्वांचे ही त्यांनी कौतुक केले ....

रो. जितेंद्र आणी भाग्यश्री महाजन व रो. डॉ. सुभाष देशपांडे यांनी दिलेल्या पावभाजी, पुलाव आणि आइस्क्रीम या उत्कृष्ट चविष्ट फेलोशिप ने सभेची सांगता झाली....














१८ सप्टेंबर रोजी "हत्तींशी गप्पा मारणारा माणूस" हा आनंद शिंदे यांचा कार्यक्रम झूम द्वारे झाला. एकूण ९ क्लबचा मिळून हा सिनर्जी प्रोग्रॅम होता. या कार्यक्रमाला सर्व क्लब सदस्य तसेच पाहुण्यांची भरपूर उपस्थिती होती.





# मी ही एक दुर्गा- देवांशी जोशी

२७ सप्टेंबर २०२१

रो. श्वेता करंदीकर




सोमवार दिनांक २७ सप्टेंबर च्या साप्ताहिक सभेत आपल्या क्लब तर्फे "मी ही एक दुर्गा" या श्रृंखले अंतर्गत, राष्ट्रपती पारितोषिक विजेती कु. देवांशी जोशी हिची मुलाखत घेण्यात आली. सध्या दिल्ली मध्ये राहत असणाऱ्या देवांशी जोशी हिने तिचे शालेय शिक्षण नागपूर मध्ये घेतले. नंतर नॅशनल ओपन स्कूल मधून ती बारावी उत्तीर्ण झाली. एखाद्या सामान्य व्यक्तीसाठी ही एक सामान्य घटना. पण देवांशी सामान्य नाही. ती जन्मतः डाऊन सिंड्रोम या आजाराने ग्रस्त आहे. असे असूनही स्वतःमधल्या आत्मविश्वासाच्या बळावर, तसेच तिच्या पालकांच्या अतिशय भक्कम आधारामुळे तीने स्वतःमधल्या उणिवांवर मात केली आहे. तिने शिक्षण तर पूर्ण केलेच, पण बिग बाजार सारख्या मोठ्या मॉलमध्ये फॅशन सेक्शनमध्ये नोकरीही मिळवली.

देवांशी ने स्वतःमधल्या त्रुटींवर मात केली आहे. ती पूर्णवेळ नोकरी करते आणि स्वतः पगार कमावते. तसेच तिने आधुनिक तंत्रज्ञानालाही आपलेसे केले आहे. या सगळ्याची पावती म्हणूनच "दिव्यांगजन सशक्तिकरणाचा राष्ट्रीय पुरस्कार" तिला मिळाला आहे. तसेच सरकार तर्फे इलेक्शन कॅम्पेनमध्ये वापरल्या जाणाऱ्या चित्रफितीत देवांशीचा सहभाग आहे.

आपल्या क्लब तर्फे ॲन प्रियदर्शनी अंबिके यांनी देवांशी व तिच्या पालकांना म्हणजेच सौ. रश्मी व श्री.अनिल जोशी यांना बोलते केले. देवांशीच्या कलाकलाने घेऊन, तिच्याशी गप्पा मारत ॲन प्रियदर्शिनीने तिच्या आयुष्यातील घटनांवर प्रकाश पाडला. या गप्पांमध्ये तिच्या पालकांकडून समाजामध्ये अशा प्रकारच्या मुलांसाठी अजूनही inclusiveness चा अभाव दिसतो ही तळमळ व्यक्त झाली. ही मुलाखत अतिशय रंगली.

सभेच्या शेवटी देवांशीच्या पालकांनी रोटरी क्लब ऑफ पुणे साउथने देवांशीला आमंत्रित करून एक प्रकारचे समाजभानच जपले आहे असे सांगून क्लबचे कौतुक केले.

सभेच्या शेवटी ॲन इंद्रायणी पूर्णपात्रे यांनी vote of thanks दिले.

Watch Video




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES




Rotary Club Of Pune South

Rotary | SERVE TO CHANGE LIVES








# पूर्णांगिनी - रो.श्वेता सुभाष करंदीकर

**ॲन अस्मिता आपटे**

Outstanding Teacher Award, Kaveri Group of Institutes Kannada Sangh Pune यांचे तर्फे मिळवणारी आपल्या क्लब ची सभासद --- रो.श्वेता सुभाष करंदीकर. किती छान योगायोग आहे पहा ना या महिन्यातील बुलेटिन मधील पूर्णांगिनी या सदरासाठी श्वेताच्या घरी गप्पा मारायला गेलो होतो त्याच दिवशी श्वेताला हे Award मिळालं. खरच खूप कौतुक वाटले. दोन वर्षांपूर्वी आपल्या क्लब मध्ये आलेल्या श्वेता विषयी काही फारशी माहिती नव्हती कारण लॉकडाऊन मुळे भेटी खूपच कमी झाल्या होत्या. पण आज तिच्या घरी मस्त कांदे पोहे खात खात तिच्याशी गप्पा मारायला खूप मजा आली. गृहिणी ते जर्मन शिकविणाऱ्या बेस्ट टीचर ची कथा सांगायला मलाही आवडेल.

पूर्वाश्रमीची श्वेता देशपांडे पक्की पुणेरी. कॉमर्स ग्रॅज्युएट होताच विवाह झाला. अहमदाबादहून आलेल्या तिच्या काकूच्या भाच्याने पाहताक्षणी पसंत केले. BE Mechanical, Plastic Technology मध्ये पोस्ट graduation केलेल्या अहमदाबाद मध्ये उच्च पदावर नोकरी करणाऱ्या सुभाष करंदीकर यांच्याशी श्वेताचा विवाह झाला . विवाहानंतर श्वेता अहमदाबाद येथे गेली. Computer चा कोर्स झालेला असल्याने दोन महिन्यात नोकरी करू लागली. अल्पावधीतच उत्तम गुजराती बोलायला आणि लिहायला शिकली. नोकरी, संसार उत्तम चालू होता. दरम्यान सुभाषला कंपनीतर्फे जर्मनीला जाण्याची संधी मिळाली. छोट्या संकेतला बरोबर घेऊन सुभाष बरोबर श्वेता जर्मनीला गेली. संकेत शाळेत जाऊ लागला. शिक्षणाची आवड असल्याने श्वेता जर्मन शिकायला लागली. संकेत आणि छोटी श्रेया या दोघांना ऑफीस मधून आल्यावर संध्याकाळी सुभाष सांभाळत असे. त्यामुळेच श्वेताचा जर्मनचा कोर्स (equivalent to MA ) पूर्ण झाला.




जर्मनीतील सहा वर्षांच्या वास्तव्यानंतर करंदीकर कुटुंब पुण्यात दाखल झाले. थोड्याच दिवसात Max Muller मधून जर्मन भाषेतील लेव्हल पूर्ण केल्या. इंग्लिश विषय घेऊन M A पूर्ण केले. त्यानंतर B.Ed व M.Ed पूर्ण केले . घर, मुल सांभाळून इतके सगळे शिक्षण घेणे, आवड आणि घरच्यांच्या सपोर्ट मुळेच शक्य झाले. मॉडर्न आणि एस पी एम शाळेत काही वर्षे जर्मन विषय शिकवले. गेली अकरा वर्षे श्वेता कलमाडी ज्युनिअर कॉलेज मधे कार्यरत आहे. तेथे ती हेड ऑफ द डिपार्टमेंट आहे.

श्वेता नॉर्मल मुलांबरोबर Gifted मुलांनाही शिकविते. त्यासाठी तिने Advanced Diploma केला. त्या मुलांसाठी वेगळा अभ्यासक्रम तयार करून त्यांना ॲक्टिविटी मधून शिकवावे लागते त्यासाठी तिने खूप मेहनत घेतली आहे.

उत्तम कविता करणाऱ्या श्वेताला संगीताची आवड आहे म्हणजे गाणे म्हणायला आणि ऐकायला दोन्ही आवडते. मुलगा संकेत सिंथेसायझर वाजवितो . तो BE Mechanical असून नुकताच तो पुढील शिक्षणासाठी (मास्टर्स इन मॅनेजमेंट) जर्मनीला गेला आहे. मुलगी श्रेयाने कथक विशारद प्रथम ही परीक्षा distinction मधे पूर्ण केली आहे. तसेच ती BBA करत आहे आणि हो तिने सुद्धा डिप्लोमा इन जर्मन language केला आहे. सुभाष सध्या Consultant म्हणून कार्यरत आहे.

अशी ही आपली खूप हुशार, शांत मनमिळाऊ मैत्रिण श्वेता...




## Bhairavi-District Awards RY 2020-21

## 25 September 2021




Rotary District 3131 Awards RY 2020-21 event "Bhairavi" was held on 25th September.
This Award ceremony function turned out to be a special occasion for RCPS. Our club was recognized for excellent work in a whopping 16 areas and categories.
The function was attended by PDG Rtn Bhausaheb and Ann Shobhatai Kudale, PP Rtn Dr Kiran and Dr Geetanjali Purohit, Rtn Manisha and Rajesh Belgaonkar and ofcourse President of RCPS RY 2020-21 Rtn. Sudarshan Natu and Ann Sugandha Natu.

Our club was recognized as follows;
1. 1st Prize - Club Administration
2. 1st Prize - Vocational Service Project
3. 2nd Prize - Environmental Project
4. 3rd Prize -Highest Contribution to Polio
5. Best President RY20-21
6. RY20-21 RI President Citation
7. Special Appreciation for TRF work
8. 100% member Contribution to Polio Fund
9. Appreciation for participation in Rotary Covid Center
10. Platinum Award for Pancham Project (District focus)
11. Certificate of appreciation to Ann Sugandha Natu for - Being an inspiration and strong support to the president and club for overall club performance
12. Certificate to Sudarshan and Sugandha for achieving Major Donor Level 1
13. Certificate to Sudarshan and Sugandha for becoming Bequest Society Level 1
14. Certificate to Sudarshan for End Polio Champion for maximum contribution
15. Special recognition of District Director PP Rajendra Gosavi for his contribution.
16. Special recognition of AG PP Rtn Dr Kiran Purohit for his contribution

---

**देणगी**

**श्रीमती विद्या साठे (निवृत्त प्राध्यापिका) यांनी गोदान प्रोजेक्ट साठी रु दीड लाख देणगी दिली आहे. याकरिता पी. पी. रो. गोविंदराव पटवर्धन यांनी पुढाकार घेतला. श्रीमती साठे व गोविंदराव यांचे खूप आभार.**
**क्लब ट्रस्टला रो. माधुरी किरपेकर यांनी रु १५,५०० तसेच रो. मृदुला घोडके यांनी रु १३,५०० देणगी म्हणून दिले. दोघींचे आभार आणि कौतुक.**






# Appointment Letter

**Rtn. Manisha Belgaonkar**

Appointment letter is a very important document in the employment of every employee. It is an agreement between the employer and employee regarding terms and conditions of the employment. Considering nature of employment, intelligently drafted appointment letter will be solution to all problems which may arise between employer and employee in future. While drafting Appointment letter, employer has to consider following important points, to avoid disputes/ litigations in future.

Name and address of the employee -Generally at the time of appointment employee gives their name and address. But at the same time, it is better to take address proof with photo ID i.e. Self-attested copy of Aadhar card and PAN card which will convenient to the employer to make any communication in future to the employee.
Designation of the employee and Job description- It is better to mention job description alongwith designation of the employee to determine status of person.
Type of employment- It is necessary to mention type of employment i.e. whether it is permanent or temporary or fixed term etc.

Probation period – To test the fitness of the person/ employees, who is fresh entrant in the service, it is advisable to mention clause of probation period in the appointment letter. In the appointment letter the initial probation period should be mentioned along with the clause that unless the probationer is confirmed in writing, he will continue to be probationer.

Transfer of an employee- Transfer of an employee to one place to another or one department to another is an incident of service. Accordingly following clause should be mention in the appointment letter of employee that,
"Your services are liable to be transferred from one machine to another and from one shift to another or from one department to another or from one section to another or from one factory / establishment to another , whether located in the same place or elsewhere and whether existing at the time of appointment or comes into existence later."

Age of retirement- It is necessary to mention age of retirement in the appointment letter, otherwise employee can continue in the employment so long as he is in the position to work. The employer has to take age proof of employee at the time of joining the employment.
Accommodation- If the Residential accommodation is provided by the employer, it necessary to mention in the appointment letter that, residential accommodation is being provided to the employee because he is being in employment and employee can be asked to vacate the same even he continues in the employment. It advisable to employer to make separate agreement with employee for residential accommodation and employee will be licensee and not tenant.

Other Clauses-
Besides above clauses some more conditions / clauses should incorporated in an appointment letter i.e. Termination/ resignation – Notice of termination/ resignation, Medically fitness of employee, Prohibition for double employment, Discipline, Maintenance of hygiene, Maintaining secrecy and confidentiality of business, Ownership of intellectual property rights, prohibition of double employment, clause of force majeure and some other clauses depend upon nature of work/ industry / work culture / applicable laws.

*Rtn. Manisha Belgaonkar is a lawyer by profession and specializes in Labour Laws and Industrial Relations. She is practicing in the Labour and Industrial Court for the past 25 years.*



# Investing = Faith, Belief and Trust


## Mr. Amit Bivalkar

**MD & CEO Sapient Wealth Advisors and Brokers Pvt. Ltd.**


It may sound similar but faith, belief, and trust are not the same and certainly not interchangeable.

Faith is in God

Belief is in yourself and

Trust is in someone else

"Belief & trust look very similar but in reality, are two different things". To comprehend this let's look at the story given below.

Sharks and Fishes:

A Marine biologist once placed a shark into a large holding tank & he put some tiny fishes into the tank. As everyone could guess the shark instantaneously came around and attacked all the fishes and had a feast. The biologist then put a strong glass divider in the tank and he repeated the whole experiment again, only this time he put fishes on one side of divider and shark on the other side of the divider. As expected, the shark again attacked the fishes, only this time there was a glass divider between them and the shark slammed on the glass ceiling and went back, it still didn't give up and kept on trying and eventually gave up after multiple attempts.

The biologist continued the experiment and each time the shark made fewer attempts to break the glass divider and eventually gave up the idea of attacking. The biologist then removed the glass divider and to his surprise, the shark didn't attack the fishes, as the shark subconsciously believed that there is glass divider in between. And the tiny fishes swam wherever they wanted without any harm.

"Belief is the death of intelligence"

A Man with a Balancing Stick:

A Man started to walk on a rope tied between two tall towers at several hundred feet above the ground. He was slowly walking with a balancing stick in his hands and carrying his son on his shoulders. Everyone in the audience was tensed and were holding their breath while watching him. The man slowly crossed the second tower and watching him cross the tower everyone in the audience was overwhelmed and overjoyed and everyone started greeting him by shaking his hands and taking selfies with him. Overwhelmed by everyone's response, the man asked, "Can I walk back to the first tower again", and what do you think about it? Everyone in the audience said yes, we are ready to bet on you and the man replied with confidence, Does anyone wants to sit on my shoulder I will take you to the first tower.

There was pin-drop silence in the audience and everyone started looking at him with a stoic look when the man asked this question, what we can comprehend from this is, to believe in someone is one thing and to trust someone is a different ballgame altogether.

With trust, there is additional commitment i.e. we need to totally surrender ourselves when we trust someone and this is something that is missing from investor's end towards equities.

As an investor, we believe that equities do well over long term but we are not willing to trust the market for that. Successful investors have the belief that equity investing in the long term creates wealth and they trust that most of the price-performance will be derived through the financial performance of the corporates.

To conclude let's build an analogy with two stories:

1. Mr. Sanders founded KFC at the age of 65

2. Mr. Jack Ma, who couldn't get a job at KFC went on to build Alibaba.

Lessons learned are:

1. Age is just a number
2. Only ones who keep trying succeed.

"After all, Excuses don't build Empires".

Long Term investing is not 9.15 to 3.30 but instead 9, 15 or 30 years!!!

*Amit Bivalkar is a Co-Founder and Managing Director at Sapient (Largest Mutual fund distribution company - manages over a billion dollars Assets) since its inception in 2009. Before starting Sapient, he has spent over 12 years working in the financial services space with leading names like DSP Merrill Lynch, Fidelity Investments, and AIG Investments. He is passionate about music and is an avid keyboard player.*






# गुरुत्वीय तरंग

रो. डॉ. सुभाष देशपांडे

1687 साली सर इसाक न्यूटन ह्या संशोधकाने गुरुत्वाकर्षणाच्या नियमांचा शोध लावला. त्याने सांगितले की, वस्तूमान असलेल्या वस्तूमध्ये गुरूत्वाकर्षण असते. दूसरा नियम असा की, गुरूत्वाकर्षण त्या वस्तूंच्या वस्तूमानाच्या समप्रमाणात असते.म्हणजेच ज्या वस्तूंचे वस्तूमान जास्त त्या वस्तूंचे गुरूत्वाकर्षण पण जास्त. तिसरा नियम असा की, हे गुरूत्वाकर्षण वस्तूमधील अंतराच्या विषम प्रमाणात असते.म्हणजे,वस्तूंमधील अंतर जितके जास्त तितके गुरूत्वाकर्षण कमी. ह्या नियमानुसार सारे विश्व चालत आहे. ह्याच नियमानुसार पृथ्वी भोवती चंद्र ,सूर्या भोवती पृथ्वी, आपल्या आकाशगंगेच्या मध्याभोवती सूर्यमाला, आणि अवकाशातील दहा हजार कोटी अकाशगंगा त्यांच्या गुरूत्वमध्याभोवती फिरत आहेत.

जरी न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचे नियम सांगितले तरी त्याना प्रत्यक्ष गुरूत्वाकर्षण म्हणजे काय हे सांगता आले नाही. ते आईन्स्टाईन ह्या संशोधकाने आपल्या जनरल थिअरी ऑफ रिलेटीव्हीटी ह्या संशोधनात सांगीतले. त्यानी असे मांडले की,अवकाश ही फक्त एक पोकळी नसून, ते अवकाश आणि काळ(Time and space) याचे विणकाम आहे. ह्या विणकामात मोठ्या वस्तूमानाच्या वस्तू फिरताना एक चरा पाडतात ज्यामुळे हे विणकामाचे कापड (Fabric) त्या ठिकाणी वक्रीभवन पावते. आता समजा सूर्याच्या मोठ्या वस्तूमानामुळे ह्या कापडात खोल चरा पडला.

तर त्याच्या बाजूच्या भिंती उतारावर असतील. ह्या उतरंडीवर पृथ्वीवजा गोटी सोडली तर ती सूर्याभोवती फिरत फिरत शेवटी सूर्याला जावून मिळेल. वस्तूमान असलेल्या वस्तूमुळे ह्या विणकामात आलेला बाक (warping)म्हणजेच गुरूत्वाकर्षण होय.

पृथ्वी जरी सूर्याने अवकाश आणि काळ यांच्या विणकामात केलेल्या वक्रिकरणामुळे, सूर्याभोवती फिरत असली तरी ती सूर्याला जावून मिळत नाही. याचे कारण असे की पृथ्वीला स्वतःची गती असते व गती असलेली वस्तू नेहमीच सरळ रेषेत प्रवास करते. एका दिशेने सूर्याचे गुरूत्वाकर्षण आणि दुसऱ्या दिशेने पृथ्वीची गती यामधील जागा पृथ्वी घेते व सरळ रेषेत बाहेर न जाता किंवा सूर्याकडे खेचली न जाता, सूर्याभोवती फिरत राहते.

याचप्रमाणे चंद्र पृथ्वीभोवती फिरतो अथवा सूर्य किंवा आकाशगंगा अवकाशाच्या विणकामात फिरत असतात. शांत सरोवरात जर बोट जात असेल तर त्या बोटीमुळे पाण्यांत तरंग उठतात. असेच तरंग ह्या मोठ्या वस्तूमानाच्या गोष्टी अवकाशाच्या विणकामातून जाताना तयार करतात. ह्या तरंगाना गुरुत्वीय तरंग (Gravitational waves) असे म्हणतात. विश्व खूप मोठे असल्यामुळे असे तरंग पृथ्वीपर्यंत येण्यास खूप वेळ लागतो व त्यामुळे ते खूप क्षीण होतात.

अशाच प्रकारे जर विश्वात एखाद्या ताऱ्याचा खूप मोठा स्फोट झाला अथवा दोन तारे एकमेकांवर आदळले किंवा दोन कृष्णविवर एकमेकांवर आदळली तरी गुरुत्वीय तरंग तयार होतात. सध्या शोधून काढलेले गुरुत्वीय तरंग अशाच दोन कृष्णविवरांच्या टकरीतून निर्माण झाले होते जी कृष्णविवरेआपल्या पासून एकशेतीन कोटी प्रकाश वर्षे दूर होती. म्हणजेच हे तरंग पृथ्वी वर येण्यास एकशेतीन कोटी वर्षे लागली. हे तरंग लिगो नावाच्या एका उपकरणाने टिपून घेतले आहेत. लिगो हे उपकरण म्हणजे अडीच मैल लांबआणि तेरा फूट व्यासाच्या दोन नळ्या आहेत, ज्या एकमेकांशी नव्वद अंशाचा कोन करतात. यात लेसर किरण सोडला असतो ज्याच्या सहाय्याने गुरुत्वीय तरंग शोधता येतात. जेव्हा गुरुत्वीय तरंग ह्या उपकरणावर आदळतात तेव्हा लेसर किरणाची सूक्ष्म हलचल होते जी आलेखाच्या रूपात दिसते. ह्या आलेखावरून तरंगा विषयी माहीती मिळते.

विश्वाच्या सुरुवातीला विश्वातील चार शक्ति, म्हणजे गुरूत्वाकर्षण, विद्युत चुंबकीय, कमकुवत अण्विक शक्ती, तीव्र अण्विक शक्ति, एकत्र होत्या. त्या हळूहळू वेगळ्या झाल्या. गुरूत्वाकर्षण शक्ति सर्व प्रथम वेगळी झाली. जर आपल्याला हे सुरुवातीचे गुरुत्वीय तरंग सापडले तर विश्वाच्या उगमानंतरच्याअगदी जवळच्या काळाचा अभ्यास करता येईल व विश्वाच्या उगमाचे कोडे पण सोडविता येईल.

गुरुत्वीय लहरींच्या शोधामुळे एकतर आईनस्टाईनचा सिद्धांत सिद्ध झालाच, त्याच प्रमाणे आपल्याला विश्व पाहण्यास प्रकाश किरणाशिवाय एक नवीन माध्यम मिळाले, ज्यामुळे पुढील काही वर्षांत खगोल शास्त्र संपूर्ण बदलून जाईल.



# फक्त एकच

## अॅन मोहिनी नातू

फक्त एकच..

धनंजय जोशी लिखित "सहज" या पुस्तकातील एक लेख व त्याचे वाचन.

Play Audio

मौन शिबिरामध्ये असताना मैत्री असते फक्त आपली आणि आपल्या मनाची....ध्यान करताना आपलं मन कुठे कुठे पळतं ना...ते सांगणं कठिण आहे... आपण म्हणतो खरं की ध्यान करताना किंवा ध्यानामध्ये ...फक्त आपल्या श्वासाकडे लक्ष द्यावे... श्वास आत, श्वास बाहेर... श्वास आत श्वास बाहेर.... तेवढंच...पण तसं होत नाही.. आपलं मन अनेक ठिकाणी पळत राहतं... आज संध्याकाळी अमुक करायचं आहे... उद्या तमुक करायचं आहे... पुढच्या वर्षीचा हा कार्यक्रम कोण ठरवणार..?? आणि कधी...?? सान सा निम आम्हाला सांगायचे.."जेव्हा जेव्हा मनामध्ये गोंधळ होतो , काय करायचं ते समजेनासं होतं तेव्हा तेव्हा स्वतःला विचारावं.".मी आता काय करतो आहे.?? व्हॉट आय ऍम डुइंग जस्ट नाऊ..??" आणि फक्त तेच करावं... आणि याचा मंत्र काय?? तर "ओन्ली धीस"..आता."ओन्ली धिस" म्हणजे काय..तर . जे काही आत्ता समोर असेल ते ....त्यात कठीण काहीच नाही .आपल्याला जेंव्हा गोंधळल्यासारखं वाटतं,खूप तणाव उभा राहतो... हे करू का ते करू असं वाटतं तेव्हा स्वतःला विचारावं... "माझ्यासमोर काय आहे? व्हॉट इझ धिस..? हे काय आहे..??" आपल्याला सहज दिसून येतं पुढे काय करावं ते... पुढे म्हणजे पुढच्या क्षणी बरं... उद्या,परवा, महिन्यानंतर,...नव्हे, नव्हे दहा वर्षानंतर... नव्हे- दहा हजार वर्षानंतर सुद्धा नव्हे बरं... फक्त एका क्षणानंतर...

हे जीवन आहे ना ते शब्दांच्या पलीकडचे सोपे अवघड हे विचारायचं नाही..

एका शिष्यानं गुरूंना विचारलं... "मार्ग कठीण आहे का .?"गुरु म्हणाले.."हो, कठीण आहे.."

दुसऱ्या शिष्यानं विचारलं.."मार्ग सोपा आहे का..?" गुरु म्हणाले.."हो,सोपा आहे.."

तिसऱ्या शिष्यानं विचारलं..."मार्ग सोपा आहे की कठीण..?? गुरु म्हणाले.. "सोपा आहे आणि कठीणही आहे"..

मला हा संवाद खूप आवडतो

शब्दांच्या पलीकडे नेणारा ..

सान सा निम म्हणायचे.. "ओपन माऊथ, ऑल रेडी अ मिस्टेक..."

तोंड उघडणं की पहिली चूक आणि तोंडामधून जे बाहेर येईल त्या चुका मागून चुका!!

माझी एक आवडती पुतणी आहे तिच्या फेसबुक वरती ती कधीकधी लिहिते... "काम चालू,मूह बंद"

मी तिला म्हटलं.."मूह बंद हे मस्त आहे"

तोंड बंद पण मन मात्र उमललेलं...

मूह बंद . माईंड ओपन... ओपन माइंड नो मिस्टेक

इतकंच

Read Past Issues मागील अंक वाचा